## <u>नियमित दिवाणी दावा क्र. ५/२०१४ मधील नि.क्र. ३६ वरील आदेश</u>
## (CNR NO MHRG14-00057-2014)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ यांनी, त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन दाव्यास कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जास म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांना नमुद केलेली कारणे ही पुरेशी नाही. तरी सदरचा अर्ज जास्तीत जास्त खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा कराराची विशिष्ट पुर्तता (स्पेसिफिक परफॉर्मन्स) करुन मिळणेकरीता व तुर्तातुर्तीचे तसेच निरंतचे मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ३ यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ३ ही एक कंपनी असून बेलिफांनी दाव्याचे समन्स प्रतिवादीच्या आवक कक्षात देवून संबंधित व्यक्तीला दिलेले कागदपत्र कशाबाबतीत आहेत, याची कल्पना दिलेली नाही. अगर तारखेची स्प्ष्ट कल्पना दिलेली नव्हती. सदरचे समन्स व नोटीस व प्रतिवादी क्र. ३ यांचे कार्यालयातील आवक कक्षात प्राप्त झाल्यानंतर संबंधित व्यक्तीने ने नजरचुकीने प्रतिवादी क्र. ३ चे प्राधिकृत व्यक्तीचे निदर्शनास आणले नाहीत व त्यामुळे प्रतिवादी हे दाव्याचे कामी हजर झाले नाहीत. त्यामुळे सदर प्रतिवादींविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झाला आहे.

५. सदर प्रतिवादी हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करणार असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक आहे. सदर प्रतिवादी क्र. ३ हे दाव्याचे कामी मुदतीत हजर होवून त्यांची कैफियत मुदतीमध्ये दिली नसल्यामुळे जो असोईस्करपणा झाला त्याकरीता प्रतिवादी क्र. ३ यांस खर्च लावून त्यांचा अर्ज मंजूर केल्यास

योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | प्रतिवादी क्र. ३ यांचा अर्ज रक्कम रु. ५०००/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | प्रतिवादी क्र. ३ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना द्यावी. |

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – २०.०६.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.